# N.S.S Special Winter Camp Report

**Camp Date : 01 Jan. 2019 to 07 Jan 2019**

**Camp Venue : At Post Jaitpur Tal Shirpur Dist Dhule**

**Prof. A.J.Maheshwari**
N.S.S.P.O.

**Dr.D.R.Patil**
Principal

R.C.Patel Educational Trust's

**R. C. Patel Arts Commerce and Science College, Shirpur**

## रा. से. यो. विशेष हिवाळी शिबीर अहवाल

या वर्षी आर.सी.पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालयाच्या रासेयो एकाकास २०१८-२०१९ या शैक्षणीक वर्षास २५० नियमित विद्यार्थी व १२५ विशेष हिवाळी शिबिरार्थी विद्यार्थी अशी परवानगी विद्यापीठाकडून मिळाली. या या वर्षी विशेष हिवाळी शिबीर घेणेसाठी मौजे. जैतपुर त. शिरपूर येथे शिबीर घेण्यासाठी विद्यापीठाने परवानगी दिली. माननीय प्राचार्यांच्या सहमतीने शिबिराचा कालवधी दि. ०१/०१/२०१९ ते ०७/०१/२०१९ असा ठरविण्यात आला.

या वर्षी विद्यापीठाने ठरविल्या प्रमाणे " स्वच्छ भारत अभियान "( Clean campus mission)- बेटी बचाओबेटी पढाओ हि थीम घेऊन विद्यापीठ व महविद्यालयाच्या पूर्व परवानगीने मौजे जैतपुर येथे सात दिवसाचे निवासी शिबीर घेण्याचे ठरले. शिबिरासाठी आवश्यक ती पूर्वतयारी, विद्यापीठाने ठरविलेल्या विषयानुसार वक्त्यांचे विषय व वक्ते यांचे नियोजन, कार्यक्रम पत्रिका छपाई, मंडप, ध्वनी प्रक्षेपक, स्वयंपाकी, किराणा, भाजीपाला यांचे नियोजन करण्यात आले.

निवडक स्वयंसेवकांना घेऊन दि. ३१/१२/२०१८ सोमवार रोजी सर्व साहित्य खाजगी वाहनाने जैतपुर येथे नेण्यात आले. जि. प. शाळेच्या परिसरात निवासी शिबीर आयोजित होते. शाळेचा परिसर स्वच्छ करून मंडप उभारण्यात आला. पाण्याची सोय करण्यात आली. दि. ३१/१२/२०१८ रोजी उद्घाटनाची तयारी प्रा. आनंद माहेश्वरी, प्रा. दीपक चव्हाण, कार्यक्रम अधिकारी आणि संघ व्यवस्थापक यांनी केली.

दि ०१/०१/२०१९ मंगळवार रोजी ठिक ८ वाजता शिबिरार्थी विद्यार्थांचे जैतपुर येथे आगमन झाले. विद्यार्थांना आवश्यक त्या सूचना देवून गट पडून संपूर्ण तयारी करण्यात आली. उद्घाटनाचा कार्यक्रम ठिक १० वाजता नियोजित वेळेवर सुरु करण्यात् आला. कार्याक्रमचे उद्घाटीका जि. प. शाळा जैतपुर येथील विद्यार्थिनी **कु. कोमल शिरसाठ** ही होती. कार्यक्रमास विशेष अतिथी सौ. कल्पनाताई राजपूत (जि. प. सदस्य, धुळे), सौ. संगीता मोरे(पं. स. सदस्य शिरपूर), श्री नेतेन्द्रसिंग राजपूत (नायब तहसीलदार,शिरपूर), सौ समाजकौर राजपूत (सरपंच, जैतपुर), श्री. हेमराजसिंग राजपूत (पोलीस पाटील, जैतपुर) व अन्य सन्माननीय मान्यवर उपस्थित होते. कार्याक्रमचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील होते.

N.S.S.

दीपप्रज्वलन , सरस्वती पूजन करून कार्याक्रमचे उद्घाटन झाले. सर्व अतिथींचे स्वागत शाल , गुलाब पुष्प देवून करण्यात आले. सौ कल्पना ताई यांनी विद्यार्थांच्या विकासात रा. से यो. चे महत्व विषद केले. मा. प्राचार्यांनी रासेयो मुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जागरूकता व मानसिकता व जवाबदारी कशी बदलते या वर भर दिला. कार्यक्रमास दैनिक पुण्यनगरीचे , देशदूत यांचे वार्ताहर श्री किशोर माळी उपस्थित होते.उद्घाटन सोहळा उत्कृष्टरित्या पार पडला. कार्यक्रमानंतर सर्व अतिथी व शिबिरार्थी यांनी स्वादिष्ठ गोबीची भाजी,बटाटे भाजी, वरण भात, पापडया यांचा आस्वाद घेतला.

दुपारच्या सत्रात माजी विभागीय समन्वयक प्रा. आर.पी.महाजन यांचे पर्यावरण/वृक्ष संवर्धन या विषयावर व्याख्यान होते. सरांनी आपला विषय मांडून विद्यार्थांशी हितगुज केली. सरांनी या संबंधी महत्वपूर्ण टिप्स शिबिरार्थींना दिल्या. संद्याकाळी विविध खेळ व गटचर्चा झाली. रात्री ८ वाजेला जेवण आटोपून सांकृतिक कार्यक्रम घेतले.रात्री च्या जेवणासाठी बी.पी.एल. कुटुंब श्री काशीराम भिल व परिवार यांस आमंत्रित केले होते. रा. १० ला दिप् मालवण करून सर्व शिबिरार्थी निद्राधीन झाले.

दि०२/०१/२०१९ रोजी नित्य कार्यक्रम आटोपून विद्यार्थी प्रभातफेरी साठी तयार झाले.टाळ मृदंग यांच्या संगतीने “ जय जय राम कृष्ण हरी” चाल धरत संपूर्ण गावात प्रभात फेरी काढली. यात गावकरी देखील सहभागी झाले. हा सकाळचा दैनंदिन कार्यक्रम सात दिवस चालला. सकाळी योगासने झाली, सकाळचा नाश्ता व चहा आटोपून शिबिरार्थी श्रमदानासाठी सज्ज झाले. गट नुसार साहित्य वाटप करण्यात आले. व गट गटाने ग्राम सफाई करण्यात आली. सदर श्रमदान १२.३० पर्यंत चालले. दुपारी १२.३० ला स्नानादी आटोपून विद्यार्थांनी रूचकर भोजनाचा आस्वाद घेतला.दुपारच्या सत्रात प्रा. डॉ.सुनील पाटील यांचे भावनांना वाट द्या या विषयावर व्याख्यान होते.सदर व्याख्यानात सरांनी आपल्या भावना कशा व्यक्त कराव्या या विषयी विविध पैलू विद्यार्थ्यांना सांगितले. त्या नंतर सरांनी आपल्या भात्यातील कवितांनी शिबिरार्थींना मुग्ध केले.विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची छान उत्तरे दिली. सदर व्याख्यान दीड तास चालले. सायंकाळी गट चर्चा झाली विविध खेळ व संगीत संध्या झाली. रात्री जेवणांत पिठले भाकरी चा बेत होता. विद्यार्थांनी आस्वाद घेतला. अहवाल लेखनानंतरदिप् मालवण केले.

दि. ०३/०१/२०१८ रोजी सकाळचा नित्य कार्यक्रम आटोपून विद्यार्थी प्रभातफेरी साठी तयार झाले. प्रभातफेरी नंतर योगासने झाली. आज नसत्या साठी उपमा बनवलेला होता. सकाळी ८.०० वाजता चहा नाश्ता आटोपून विद्यार्थी श्रमदानासाठी तयार झाले. आज काही गट

N.S.S.

हनुमान मंदिर परिसराची साफसफाई करण्यास तयार झाले. तेथील विटा, उचलून रचणे, गवत साफ करणे, जामिन सपाट करणे , संपूर्ण परिसर स्वच्छ करणे इ. कामे सर्व विद्यार्थांनी केली. दु. १.०० वाजेपर्यंत श्रमदान चालले. दुपारी भोजनानंतर विद्यार्थांनी थोडी विश्रांती घेऊन व्याख्यान सत्रासाठी सज्ज झाले. दुपारच्या बौद्धिक सत्रात आज प्रा एस.डी.मोने यांना निमंत्रित केले होते. सरांचा सोशल मेडिया हा होता. सरांनी अतिशय सोप्या भाषेत आपला विषय मांडला.विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची छान उत्तरे दिली. आजच्या दुसऱ्या सत्रात प्रा डॉ राहुल सनेर यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर व्याख्यानास आमंत्रित केले होते. सरांनी स्पर्धा परीक्षा चे महत्व , अभ्यास व सराव या सर्व बाबींवर विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले.विद्यार्थांनी विचारलेल्या प्रश्नांची छान उत्तरे दिली. सायंकाळी डिजिटल साक्षरता याची जनजागृती करणे साठीची डिजिटल साक्षरता रॉली संपूर्ण गावात काढण्यात आली. विविध घोष वाक्यांसह शिबिरार्थी यांनी रॉलीत सहभाग नोंदविला. शिबिरार्थीनी गट गटाने प्रत्येक गावकऱ्या कडे जाऊन कॅशलेस व्यवहार, पेटीएम चा वापर ,धनादेश काढण, नेट बँकिंग मोबाईल बँकिंग या सर्व बाबींवर जनजागृती केली. सदर मोहीम दोन तास चालली. रात्रीच्या रुचकर भोजना नंतर अहवाल लेखन करून दिवसाची सांगता दीप मालवण करून केली.

दि. ०४/०१/२०१९ ची सुरुवात नित्यकाम आटोपून प्रभात फेरीने झाली. सकाळी योगासने आटोपून सकाळी ८.०० ला शिबिरार्थी चहा व नाश्ता साठी तयार होते . आज मठाची उसळ होती सर्वांनी त्याचा आस्वाद घेत श्रमदानाची तयारी केली. आजचे श्रमदान दोन टप्प्यात होते. शिबिरार्थी दोन गटात विभागून श्रमदानास सुरुवात केली पहिल्या गटाने ग्राम स्वच्छता करून गटारी स्वच्छ केल्या. दुसऱ्या गटाने जि.प.शाळेचा मागील परिसर जो खूपच खराब झालेला होता त्याची स्वच्छता करण्यासाठी झाडे कापली, गवत उपटले, संपूर्ण परिसर पिंजून काढत स्वच्छ केला. संपूर्ण कचरा बाहेर फेकला. सदर श्रमदानास तीन तास लागले. दुपारच्या रुचकर भोजनान्तर शिबिरार्थीनी थोडा विश्राम करून दुपारच्या बौद्धिक सत्राची तयारी केली. दुपारच्या सत्रात डॉ.अविनाश पाटील यांचे मोबाईल प्रदूषण या विषयावर व्याख्यान होते सरांनी अतिशय सुंदर शब्दात आपला विषय मांडला व शिबिरार्थींच्या सर्व शंका व प्रश्नांचे उत्तरे दिली.मोबाईल प्रदूषण याचे परिणाम कसे होतात या वर सरांनी भर दिला. आजच्या दुस-या सत्रात बेटी बचाओ बेटी पढाओ या विषयावर गटचर्चा घेण्यात आली सर्व शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी या गत चर्चेत सहभाग नोंदविला सादर गटचर्चा दोन तास चालली.आज सायंकाळचे विविध खेळ रद्द करून रात्रीच्या भोजन लवकर आटोपून घेतले कारण रात्री ठिक. ८.०० वाजता महिला मेळाव्याचे आयोजन केले होते. त्यासाठी सरपंच साहिबा पासून सर्व गावकरी महिलांना आमंत्रित करण्यात आले होते. तेथे शिबिरार्थी मुलांना थांबण्यास मनाई

होती. ठिक ८ वा. महिला मेळावा सुरु झाला आलेल्या निमंत्रितांचे स्वागत प्रा. वंदना पाटील यांनी केले. व सर्व प्रथम शोचालय निर्मिती वर जनजागृती करण्यात आली. नंतर विविध विषयावर महिलांनी आपले विचार मांडले त्यात स्त्री आरोग्य समस्या, ऊर्जा बचत, शोचालाय निर्मिती इ. वर चर्चा झाली जवळ जवळ दोन तास हा जनजागृतीचा कार्यक्रम चालला. कार्यक्रमाची सांगता चहापानाने झाली. रात्री १०.३० ला अहवाल लेखन झाल्यावर दीप मालवण केले

दि ०५/०१/२०१९ ची सुरुवात " जय जय राम कृष्ण हरी" हया गजराने प्रभात फेरी झाली. प्रभात फेरीने झाली. त्या नंतर योगासने आटोपून शिबिरार्थी चहा व नाश्ता साठी तयार झाले. आज स्वयंपाकी बाबांनी पोहे तयार केले होते सर्व शिबिरार्थीनी चहा नाश्ता घेऊन श्रमदानासाठी तयार झाले. आजचे श्रमदान हे दोन टप्प्यात होते. काही गटांनी बी. पी एल वस्ती साफ सफाई तर काही गटांनी ग्राम सफाई,शाळेचा ,अमरधाम परिसर स्वच्छ करणे, गटारी स्वच्छ करणे असा होता, सर्व साहित्य घेऊन शिबिरार्थी श्रमदानास निघाले. सर्वी कामे विभागली गेली असल्यामुळे अतिशय शिस्तीत संपूर्ण श्रमदान करून, सर्व परिसर स्वच्छ केला. सदर श्रमदानास तीन तास लागले. दुपारच्या रुचकर भोज नंतर शिबिरार्थींनी थोडी विश्रांती घेऊन दुपारच्या बौद्धिक सत्राची तयारी केली.

आजच्या पहिल्या सत्रात प्रा. डॉ. नितीन निकम, वरिष्ठ पर्यवेक्षक, ए.आर.टी. सेंटर, उपजिल्हा रुग्णालय शिरपुर, यांना निमंत्रित केले होते. सरांना एच आय.व्ही. मुक्त भारत हा विषय दिला होता.सरांनी अतिशय सुंदर पद्धतीने एच. आय. व्ही. होण्याची कारणे, विविध प्रकार, लक्षणे या वर सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसन केले. आजच्या दुसऱ्या बौद्धिक सत्रात श्री पंकज चव्हाण, सिकलसेल विभाग , उपजिल्हा रुग्णालय शिरपुर यांना सिकलसेलची जनजागृती करणे साठी निमंत्रित केले होते. सरांनी अतिशय सोप्या भाषेत सिकलसेल ची माहिती. सिकलसेल रोगाची ओळख , उपाय , उपचार या वर आपले विचार मांडले व जनजागृती केली. शिबिरार्थी विद्यार्थ्यांचे शंका निरासन करून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.हे सत्र आटोपल्यावरसायंकाळी ५.३० वाजता " स्वच्छ भारत अभियान " या के.बी.सी उमवि च्या या मोहिमेचा एक भाग म्हणून गट चर्चा करण्यात आली. सदर गट चर्चा गावकऱ्यांच्या सहवासात पार पडली. स्वच्छतेचे महत्व विषद करण्यात आले . रात्रीच्या भोजना नंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाला. रात्री अहवाल लेखन झाल्यावर दीप मालवण केले.

दि०६/०१/२०१९ ची सुरुवात सकाळी ५.३० ला प्रभात फेरीने झाली. योगासने व व्यायाम आटोपून स्नानादी करून विद्यार्थी चहा नाष्ट्यासाठी तयार झाले. चहा नाश्ता आटोपून

N.S.S.

विद्यार्थी  श्रमदानास तयार झाले. श्रमदान हे दोन टप्प्यात होते. काही गटांनी श्रमदान हे गावातील गावातील दुर्गा माता मंदिर या परिसरात साफ सफाई केली. नंतर संपूर्ण परिसर स्वच्छ करून शेणाने पायऱ्या सारवून दिल्या. सदर श्रमदानास तीन तास लागले.काही गटांनी गावातील विविध परिसराची साफसफाई केली. दुपारी सर्वांसाठी गोबी बटाटे टमाटे मिक्स भाजी व पोळी चा बेत होता शिबिरार्थींनी स्वादिष्ट भोजनावर ताव मारला. थोड्या विश्रांतीनंतर शिबिरार्थी दुपारच्या बौद्धिक सत्रासाठी तयार झाले. आजच्या बौद्धिक सत्रात प्रा.डॉ कल्पेश पाटील एच. आर. पटेल फार्मसी महाविद्यालय, शिरपूर. यांना निमंत्रित केले होते. सरांना आरोग्य: रक्त दान श्रेष्ठ दान या विषयावर व्याख्यानास बोलविले होते. सरांनी रक्त दानाचे महत्व विशद केले. शिबिरार्थी विद्यार्थांना असलेल्या शंकांचे निरासन केले.  शिबिरार्थींच्या विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले. सदर विषय सरांचा संशोधनाचा असल्यामुळे सरांनी या विषयाच्या विविध पैलूंवर सखोल माहिती शिबिरार्थींना दिली. सदर व्याख्यान दीड तास चालले.आजच्या बौद्धिक सत्राचे दुसरे व्याख्यान प्रा.डॉ. मनीष गगराणी यांचे  मादक पदार्थांचे सेवन: दुष्परिणाम व उपाय या विषयावर होते. सरांनी आपला विषय अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना सांगितला व  शिबिरार्थी विद्यार्थांना असलेल्या शंकांचे निरासन केले. शिबिरार्थींच्या विचारलेल्या प्रश्नांचे निरसन केले.सायंकाळी  रा.से.यो. विभागीय समन्वयक डॉ. ए.जी.सोनावणे यांनी शिबिरास भेट दिली. सरांचे स्वागत प्रा. दिपक चव्हाण यांनी केले. सरांनी सर्व शिबिरार्थी विध्यार्थांशी हितगुज केली. व शिबिराची संपूर्ण माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंद माहेश्वरी यांचे कडून घेतली.   रात्रीच्या भोजनात कडी खिचडी कांदे असा बेत होता शिबिरार्थीनी त्याचा आस्वाद घेतला.रात्रीच्या सांस्कृतिक कार्यक्रमानंतर दीप मालवण केले.

या शिबिराच्या अनुषंगाने आव्हान शिबिरात सहभागी रा.से.यो. माजी स्वयंसेवक कल्याण महाजन यास आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण सर्व शिबिरार्थी विद्यार्थ्यांना देण्यात आले त्यासाठी सरळ दोन दिवस त्यास शिबिरात बोलविण्यात आले होते. तसेच आर. डी. पथसंचालन शिबिरात सहभागी असलेल्या रा. से यो. स्वयंसेवक प्रीतम पाटील यास ही शिबिरात आमंत्रित करण्यात आले होते. त्याने बार्शी सोलापूर व हैदराबाद, तेलन्घना येथील व आर. डी. परेड मुंबई   सहभागी तीन शिबिराचे आपले अनुभव सर्व शिबिरार्थी  विद्यार्थ्यांना सांगितले.

दि.०७/०१/२०१९ ची सुरुवात प्रभातफेरी ने झाली. आज समारोपाचा दिवस होता.  योगासने आटोपून विद्यार्थी चहा नाष्ट्यासाठी तयार झाले. ते आटोपून  समारोपाच्या कार्याक्रमाची तयारी केली.  सकाळी १०.०० वाजेच्या बौध्दिक सत्रात के.बी.सी.उमवि रासेयो विभागीय

N.S.S.

समन्वयक प्रा.डॉ. ए.जी. सोनवणे सरांचे " जातिमुक्त भारत: समृद्ध भारत या विषयावर व्याख्यान आयोजित होते. सर्व शिबिरार्थी व्याख्यानासाठी तयार झाले सरांनी विविध पैलूवर छान प्रकाश टाकला विद्यार्थी ही समरस झाले. सर्वांनी आपल्या शंका उपस्थित केल्या. सरांनी सर्व शंकांचे निरसन केले. दुपारच्या भोजनात मठाची भाजी. मसालेभात, कढी, मोहन थाळ, पापडया असा बेत होता. महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व केबीसीउमवि रासेयो विभागीय समन्वयक डॉ. ए.जी. सोनवणे सर, गावातील सर्व मान्यवर व्यक्ती समारोपासाठी हजर होते. दुपारच्या भोजनाचाआस्वाद घेतल्या नंतर समारोपाचा कार्यक्रम ठीक २.०० वाजता सुरु झाला. समारोपाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील होते. कार्यक्रमासाठी गावाचे सरपंच, ग्रामसेवक , पोलीस पाटील, उप सरपंच,सौ. कल्पनाताई राजपूत (जि. प. सदस्य, धुळे), सौ. संगीता मोरे(पं. स. सदस्य शिरपूर), श्री नेतेन्द्रसिंग राजपूत (नायब तहसीलदार,शिरपूर), व सर्व सन्माननीय मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. मा. प्राचार्यांचा, उप प्राचार्यांचा सत्कार कार्यक्रम अधिकारी प्रा. आनंद माहेश्वरी व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी दीपक चव्हाण यांनी केले सर्व आमंत्रित मान्यवरांचा सत्कार मा. प्राचार्य व उप-प्राचार्य यांनी केला. त्यानंतर कार्यक्रमाचे अहवाल वाचन प्रा. माहेश्वरी यांनी केले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांपैकी पाटील दिपाली, पटेल रियाझ यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गावाचे प्रतिनिधी म्हणून श्री भैरव राजपूत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिरार्थींची शिस्त व आचरण गावकरींना भावले. अध्यक्षीय भाषणात मा. प्राचार्यांनी गावकरींना धन्यवाद केले. व शिबिरार्थींनी आपल्या भावी आयुष्यात रा. से. यो. ची शिस्त अंगीकारावी असे सांगितले. मा. प्राचार्यांनी रा से यो मुळे सामाजिक बांधिलकी कशी जोपासावी हे सांगून आम्हाला संबोधिले.कार्यक्रमचे सूत्रसंचालन शिबिरार्थी विद्यार्थिनी गौरी मराठे हिने केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. दिपक चव्हाण यांनी केले. तसेच शिबिराच्या यशस्वीतेसाठी ज्या गावकरींनी अनमोल सहकार्य केले त्यांचा सत्कार करून आभार मानले. कार्यक्रम संपल्यावर सर्व साहित्यांची जुळवाजुळव करून सर्व सामान खाजगी वाहनात ठेवले. नंतर सर्व शिबिरार्थी यांनी महाविद्यालयाकडे प्रस्थान केले. सर्वांसाठी हा एक चांगला व नवा अनुभव होता. संपूर्ण शिबीर यशस्वीरित्या संपन्न झाले.

**प्रा आ. ज. माहेश्वरी**

(रासेयो कार्यक्रम अधिकारी)

N.S.S.

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीराची क्षणचित्रे २०१८-१९**

Inauguration Program of N.S.S Winter Camp at Jaitpur Village at 2018-19.

N.S.S.




Adopted Village Cleaning Program in N.S.S Winter Camp at Jaitpur Village













**Guest delivered Lecture on the various social issues to create awareness**













**Digital Literacy Rally in Jaitpur**






**Survey on Digital Literacy**






**Guest Lecture on "Sickle Cell Awareness "**






**Guidance by Senior Volunteer and Drama on "Drug Prohibition"**






**प्रा आ. ज. माहेश्वरी**

(रासेयो कार्यक्रम अधिकारी)

N.S.S.